# श्री समर्थ रामदास स्वामींची भक्तिभावपूर्ण देवी स्तवन

अनंत युगाची जननी ।
तुळजा रामवरदायिनी ॥
तिचे स्वरूप उमजोनि ।
राहे तो ज्ञाता ॥ध्रु.॥

शक्तीवीण कोण आहे ।
हें तो विचारून पाहे ।
शक्ती विरहित न राहे ।
येश कीर्ती प्रताप ॥१॥

शिवशक्तीचा विचारू ।
अर्धनारी नटेश्वरू ।
दास ह्मणे हा विचारू ।
तत्वज्ञानी जाणती ॥२॥

**रामवरदायनी जननी**

रामवरदायनी जननी
रूप कळे कळे मननी ॥ध्रु.॥

गगनमंडळी गुप्तखेचरा ।
योगीमुनिजन ध्यानीं ॥१॥

रम्य योगिनी नाटकलीला ।
सकळभुतीं भुवनी ॥२॥

अंतरवासी दासविलसी ।
उर्ध्व भरे गगनी ॥३॥

## आदिशक्ती परमेश्वरी

आदिशक्ती परमेश्वरी नारायणी रे
सर्व काही हे तुझी करणे रे ।
कळो आली तत्वविवरणी रे ।
त्रिगुणी हे अवतार मांडणी रे ।
शक्तिविणे कोणाची काया चाले ले ।
शक्तिविण शरीर कैसे हाले रे ।
शक्तिविण वचन कोण बोले रे ।
शक्तिगुणे सकळ थोर जाले रे ॥१॥

परा पश्यंति मध्यमा वैखरी रे ।
जयाचेनि उठती वाचा चारी रे ।
शक्तिविणे बापुडा देहधारी रे ।
शक्तिविण तो काहीच न करी रे ॥२॥
मुळारंभी तयेचा उदो जाला रे ।
पांचाभूतांचा गोंधळ मांडला रे ।
रात्रंदिवस मायेचा लो लागला रे ।
सदानंदी आनंद मोठा जाला रे ॥३॥

सर्व शक्ति आहे विस्तारली रे ।
दैव दैत्य उदंड ख्याति जाली रे ।
संतसाधु विचारी प्रवर्तली रे ।
मूलाकडे पाहता गुप्त जाली रे ॥४॥

दास ह्मणे हे तिचे चि करणे रे ।
काही येक चालेना तिजविण रे ।
प्रचीतीने पाहावे निरुपण रे ।
लोक व्यर्थ बुडताती मीपणे रे ॥५॥

## ब्रह्मकुमारी शारदा

ब्रह्मकुमारी ते शारदा वरदा । ब्रह्मकुमारी शारदा ॥ध्रु.॥
साधकाचे अभ्यंतरी । चतुर्विद्या वागेश्वरी ॥१॥
स्फूर्तिरूपे प्रकाशली । वाचारूप अनुवादली ॥२॥
रामदासी कार्यसिध्दी । चित्ती सहज समाधी ॥३॥

## वंदिली सरस्वती

कथा कथनी वंदिली सरस्वती ।
कथा कथनी वंदिली ॥ध्रु.॥

हंसवदनी वेदमाता ।
चतुराननाची दुहिता ॥१॥

शब्द ब्रह्माची निजलता ।
कल्पतरू वाग्देवता ॥२॥

ब्रह्मविद्येची निजखाणी ।
रामदासाची जननी ॥३॥

**तुळजामाता येऊ पाहते घरा**

तुळजामाता येऊ पाहते घरा ।
चौक भरा मोते फुलोरा ।
शुध्दभावे दंडवत करा ॥ध्रु.॥

जाई जुई चंपक अंबई नाना पुष्पे ढीग ठाई ठाई ।
सिंहासनी सुंदर तुकाई ॥१॥

केशर कस्तुरी चुवा चंदन ।
गव्हले कचोरे अगर बावन ।
ऊद गुलाल नरव रातांजन ॥२।

नाड्या पुड्या कुंकुम अबीर ।
जबादि पाच शुध्द कर्पूर ।
सिलारस उदबत्या थोर ॥३॥

पाने फुले सुगंध तेले ।
गर्द माजे एकत्र जाले ।

सुवास घेता चित्त निवाले ॥४॥
दवना मोरुवा कुसुंबा कुंवा ।
पूजिली अंबा अंबा जगदंबा ।
पुष्पमाळा लंबा कदंबा ॥५॥

सांगोपांगे यंग उपांग ।
चटक्या चंग चंग मृदांग ।
माज रंग रंग सुरंग ॥६॥

अंतर्येक शरीर दोनी ।
दास म्हणे धन्य भोवानी ।
निजपद देते भक्तालागुनी ॥७॥

## जगन्माता

वोळलीं जगन्माता । काय उणे रे आतां ।
वैभव जात जातां । भक्त हाणती लाता ॥ध्रु.॥

बोलले भूमंडळ । परिपूर्ण पाहतां ।
राम आणि वरदायिनी । दोन्ही एकचि पाहतां ॥१॥

मनामाजी कळो आलें । तेणे तुटली चिंता ।
रामरूप त्रिभुवनी । चाले सर्व हि सत्ता ॥२॥

रामदास म्हणे माझे । जिणें सार्थक जाले ।
देवोदेवी ओळखितां । रूप प्रत्यया आले ॥३॥

## देवीस्तोत्र

कालिका काळरात्री तें । काळ काळा संहारवी ।
कुमारी दैत्य मारी ते । कुळदेव्या भूमंडळी ॥१॥

खेचरां खेळवी लेकां । खड्ग खेटक धारिणी ।
खुंटला यत्न खोळंबे । ते काळी रक्षिते बळें ॥२॥

गोंदली नाचती गाती । गुंतला लोक उगवे ।
गंगा भागीरती माता । गांजिता धांवते बळे ॥३॥

हो हो हो दैत्य होता है । अघोरा घोररूपिणी ।
घुमारे घुमवीताहे । घोरसे घोन कारणी ॥४॥

चंचळा चपळा देव्या । चमके सचराचरी ।
चुकचुकवी लक्ष चौऱ्हांसी । चालते पुरुषाकृती ॥५॥

चकतां घालिते किती । तुछे राजे महांबळी ।
काकुस्थ वरदा देव्या । इच्छिलें पुरवीतसें ॥६॥

जननी जान्हवी माता । जुनाट जगदेश्वरी ।
जुंझार जुंझता मोडी । पाडिते संकटी खडां ॥७॥

झटाळा दाखवी झोले । तरिते बहुतांपरी ।
त्रैलोक्य झुलवीताहे । झीलटे नेणती मुढें ॥८॥

## तुळजा कुमारी

तुळजा कुमारीचे रूप । अथवा बायकांचे रूप ।
नाना प्रकारी स्वरूप भक्तालागि दावितो ॥१॥

भक्ता प्रसन्नचि होतो । अथवा ख्यानति लावीतो ।
प्रचीत रोकडी दावितो । भक्तिभावे सारिखी ॥२॥

दास म्हणे चुको नये । देवापाशी उणे काय ।
तुते आपाये उपाये । दोनी सित्ध असती ॥३॥

## भवानी देवी

तुकाई यमाई नमूं चेडाबाई
जाखाई जोखाई सखाई ते ॥१॥

सखाई जगदंबा आदिशक्ति अंबा ।
तुम्ही त्या स्वयंभा दाखवावे ॥२॥

दाखवावे तुम्हा सर्व पैलीकडे ।
देखतांचि घडे मोक्षपद ॥३॥

मोक्षपद घडे मोक्षासी पाहतां ।
तद्रुपचि होता दास म्हणे ॥४॥

सर्वारंभी मुळारंभी । वंदिजे गणनायेकु ।
विद्या सुबुधी देता हे । सर्वत्र तो भुमंडळी ॥१॥

चतुर्भुजा वेदमाता । वीणापुस्तकधारिणी ।
वंदिता अंतरी वाढे । स्फुर्तीरूपें प्रकाशते ॥२॥

मुळीची मूळमाया ते । आदिशक्ती परमेश्वरी ।
आमुची कुळदैव्या ते । ह्मैसासुरासी मर्दनी ॥३॥

शक्तीरूपे जगन्माता । वर्तते जगदांतरी ।
त्रिलोकी जितुके प्राणी । शक्तीवीर वृथा वृथा ॥४॥

प्रसीध तुळजा माता । श्रीराम वरदायनी ।
कुळासी पाळिलें मुळी । आतां आह्मासी पाळते ॥५॥

चुकता शक्ती नेता हे । सामर्थ्य ते कैचे पुढे ।
कृपाळु जन्ननी वोळे । तत्काळ मनकामना ॥६॥

बहुतांचे कुळी आहे । पाहा प्रचीती रोकडी ।
कृपेने रंक ते राजे । सामर्थ्य वर्तती जनी ॥७।

चुकतां क्षोभते नेटे । राजे रंक करी पुन्हा ।
आरोग्या रोग लावीते । फोडी सर्वांग खांडके ॥८॥

थबथब गळती काया । वोल्या कृष्टेची नासती ।
शुभ्र सर्वांग होता हे । नायटे फुटती बळे ॥९॥

हात जाती पाय जाती । जींव्हा जाती फुटोनियां ।
बोलतो तुळजा माता । पुन्हा सर्वांग नेटके ॥१०॥

श्रोत्र जाती नेत्र जातो । वाचा जाती न बोलवे ।
उदंड रोग व्याधी त्या । किती ह्मणोनि सांगणे ॥११॥

धडासी विधडी रागे । दयेनें नीट होतसे ।
संपन्न मागती भिक्षा । चालेना तीज वेगळें ॥१२॥

बोलिलें चुकती प्राणी । त्यासी दंड परोपरी ।
पिशाच्यें खेळती आंगी । फेंपरी भरती बळें ॥१३॥

प्रचीत ये चमत्कारें । तोषतां जगदेश्वरी ।
नेसती नीबारे कीती । यती ते लोटांगणी ॥१४॥

बगाडे खेळती नौंसें । जीव्हा कापुन वाहाती ।
कुलुपें घालिती तोंडी । येक ते सीर वाहाती ॥१५॥

पुन्हा ते लागती सीरे । जीव्हा येती करांगुळ्या ।
सामर्थ्ये जागते मोठे । जागती जगजोती हे ॥१६॥

कामनेसारिखी वाचा । गोविती बहुतांपरी ।
तुष्टता तुळजा माता । पुरती मनकामना ॥१७॥

चुकतां दाविते साक्षी । कोण्हीयेकें चुको नये ।
बाळका जननी पाळी । तैसी ते पाळिते जना ॥१८॥

कृपाळु जननी मोठी । अन्याय क्षमणे बहु ।
मागिणी जोगिणी पत्रें । कुमारी स्वासिणी बऱ्या ॥१९॥

गोंधळ भोग घालावे । बोलिलें तें चुको नये ।
असोनि वचणे खोटे । अभावे बुडती घरे ॥२०॥

वौंशची बुडती लोकी । ऐशा उदंड ख्यानती ।
देउं जाणे घेउं जाणे । भक्ती ते पाहिजे बरी ॥२१॥

सीवकळा सीध देव्हारें । तेथे पुसोन पाहाणें ।
चुकले पडते ठाईं । सद्य प्रचीत रोकडी ॥२२॥

आनंद वाढवी लोकी । आनंदी याच कारणे ।
तुळजा वोळली घ्यावी । पुजावी बहुतांपरी ॥२३॥

वेसणी घलिती नाकी । जावळी जट राखती ।
लेकुरे वाहाती देवा । वैभवें बहुतांपरी ॥२४॥

पुजीतां तुळजा माता । तेणे सुखची होतसे ।
विध्योक्त होम विधाने । नैरात्र घटस्थापना ॥२५॥

मेहुणे पुजीती भावे । नाना पदार्थ देऊनी ।
संतुष्ट कुमारी कीजे । तेणे संतुष्ट होतसे ॥२६॥

बोलके नेटके पक्षी । नाना रंगे नाना गुणी ।
तैसोची स्वापदे नाना । देवालई परोपरी ॥२७॥

कुमरी कुमर द्रव्ये । नाना आलंकार नेटके ।
नाना रंगे नाना वस्त्रे । आमोल्ये बहुजिन्नसी ॥२८॥

विलास भोग देवाचे । किती ह्मणोनि सांगणे ।
संगीत गीत वाद्येतें । सुगंध बहुतांपरी ॥२९॥

तांबोल भोजने नाना । नाना पुष्पें फळें बहु ।
उत्तमें शयनें यानें । वैभवा तुळणा नसे ॥३०॥

रामदास ह्मणे माझी । माता हे जगदेश्वरी ।
ऐश्वर्य सर्व शक्तीचे । विवेकें प्रत्ययें पाहा ॥३१॥

शक्तीने मिळते सर्वे । शक्तीने भोग होतसे ।
पुजोली बतीसा श्लोकी । आदिशक्ती नारायणी ॥३२॥

प्रपंची आमचे कुळी तुळजा कुळदेवता ।
नेणतां ऐकल होतं जाणतां स्मरले मनी ॥१॥

श्रेष्ठाची कामना होती पुरविली मनकामना ।
नवस जो नवसिला होता तो त्यापासून चुकला ॥२॥

पुत्र जो घेतला त्याचा जोगी करूनि सोडिला ।
ख्याति ते ऐकिली मोठी न्यायनीती चुकेचना ॥३॥

वैराग्य घेतले पूर्ण सर्व संसार सोडिला ।
तुझिया दर्शना आलो कृपादृष्टी विलोकीजे ॥४॥

तुझ्या कृपे वांचलो हे महंत म्हणतो तया ।
तुझेचि सर्वहि देणे सर्वहि तुजपासुनी ॥५॥

संसारी मोकळे केले आनंदी ठाव दिधला ।
सांडिली सर्वहि चिंता माता तूं सत्य जाहले ॥६॥

पूर्वील काय मी सांगू इच्छा पूर्ण परोपरी ।
मागील आठवेना की आश्चर्य वाटते मनी ॥७॥

सदानंदी उदय जाला सुख संतोष पावलो ।
पर आधीनता गेली सत्ता उदंड चालली ॥८॥

उदंड ऐकिले होते रामासी वरु दिधला ।
दास मी रघुनाथाचा मज ही वरदायिनी ॥९॥

श्रेष्ठांचा नवस जो होता फेडिला तोचि मी म्हणे ।
पुष्प देऊनि उतराई ऐसे हे कल्पिलें मनी ॥१०॥

तुळजापूर टाकोनि चालली पश्चिमेकडे ।
पारघाटी जगन्माता सध्या येऊनि राहिली ॥११॥

ऐसे हे ऐकिले होते हेत एथेंचि पातला ।
पुष्पाची कल्पना होती पुष्प तेथेंचि वाहिले ॥१२॥

ऐशी दयाळूमाता तूं त्वा हे पुष्प घेतले ।
संतुष्ट भक्तीभावाने त्रैलोक्यजननी पहा ॥१३॥

थोड्याने श्लाघ्यता मोठी थोर संतोष पावलो ।
तुझेचि तुजला दिल्हे आणिले सांग कोठुनि ॥१४॥

रक्षिता देव देवांचा त्याचा उत्साह इच्छिला ।
संकटे वारिली नाना रक्षिला बहुतापरी ॥१५॥

जीवीचे जाणती माता तूं माता मज रोकडी ।
लोकांची चुकती माता अचूक जननी मला ॥१६॥

एकचि मागणे आतां द्यावे ते मज कारणें ।
तुझाचि वाढवी राजा सीघ्र आम्हांसि देखता ॥१७॥

दुष्ट संहारिले मागे ऎसे उदंड ऎकिले ।
परंतु रोकडे काही मूळ सामर्थ्य दाखवी ॥१८॥

देवांची राहिले सत्वें तूं सत्त्व पाहिसी किती ।
भक्तांसी वाढती वेगी इच्छा पूर्णचि ते करी ॥१९॥

रामदास म्हणे माझे सर्व आतुर बोलणे ।
क्षमावे तुळजे माते इच्छा पूर्ण परोपरी ॥२०॥

## तुळजा भवानी

बाळका वाढवी माता । जेथे तेथे परोपरी ।
स्वभावे जीवीचे जाणे । अंतरी विवरे सदा ॥१॥
बाळका बोलता येना । हीत तेही कळेचिना ।
हेंकाड बावळे वेडे । मातेला प्रिय होत असे ॥२॥

अन्याई अवगुणी खोडी । कुश्चीळ रडते सदा ।
अंतस्ते माय लोभाळु । लोभे गुणास वाढवी ॥३॥

नागिवे उघडें लोळे । होगे बोकी आव्हासव्हा ।
तैसाच नेटके दावी । लेववी नेसवी सदा ॥४॥

मातेचा कळवळा मोठा । लोभासी तुळणा नसे ।
आळसेना विसंभेना । कंटाळेना कदापि ही ॥५॥

त्रैलोक्य बाळका पाळी । वाढवी शहाणे करी ।
कुळेची पाळिली किती । कुळदेव्या म्हणोनिया ॥६॥

त्रिलोकी पुरली आहे । त्रैलोक्यजननी पहा ।
तेचि हे तुळजामाता । भक्तांसी पाळिते सदा ॥७॥

वोळखी सांडिली बाळे । तिला तो सांडिता नये ।
लोभेची पाळणे लागे । नाना देही भरोनिया ॥८॥

मात्रकुळ पित्रकुळ । सर्वांसी पाळिते सदा ।
आद्यंत ठाऊके आहे । कुठमुळाग्र सर्वही ॥९॥

उपजली वाढली कोठे । हिंडली फिरली किती ।
भाग्यांचे करंटे जाले । मूर्ख वित्पन्न सर्वही ॥१०॥

विश्वाची साक्षिणी माता । विश्वमाता म्हणोनिया ।
श्रीमंत करंटे तीने । रक्षिले पाळिले किती ॥११॥

तिचा लो लागला आहे । त्रैलोक्य सगळै जना ।
तिवीण विषयो कैचा । जगजोती चहुकडे ॥१२॥

जीणे ती लागले आहे । ज्ञाते हो समजा बरे ।
शक्तीने चालतो देहो । शक्ती नस्तां देहे पडे ॥१३॥

शक्ती ते सर्व शक्तीते । आदिशक्ती पुरातना ।
दासासी पाळते लिला । ध्यानमूर्ति ठसावली ॥१४॥

## इच्छा पूर्ण करी

इच्छा पूर्ण करी माता । वाढवी बहुतांपरी ।
दयाळु मयाळु माता । स्वभावें जाणती कळा ॥
जीवीचा पुरला हेतु । कामना मनकामना ।
घमंड जाहाले मोठे । घबाड साधले बळे ॥

रामवरदायनी माता । दासे धुंडुन काढली ।
वोळखी पाडितां ठाई । भिन्न भेद असेचिना ॥

तुझा मी मी तुझा माते । ऐसें हे बोलणे नव्हे ।
तुझी तुं तु तुझी माता । जगज्योति कृपाळुवे ॥

उदो उदो तुझा उदो । जाहला सचराचरी ।
गोंधळु घातला देवी । ब्रह्माविष्णु महेश्वरी ॥

## भवानी स्तवन

काळिका काळिका ऐसें । ऐकिलें बहुतांपरी ।
प्रत्ययो सांगती मोठा । पुरवी मनकामना ॥१॥

उदंड ऐकिली कीर्ति । मूर्ति फार पराक्रमी ।
चित्त हे वेधले माझें । पुरवी मनकामना ॥२॥

प्रचिती रोकड्या येती । लोक कल्याण पावती ।
उभाउभी चमत्कारे । पुरवी मनकामना ॥३॥

फांकली कीर्ति ते मोठी । उदंड विश्वतो मुखी ।
धन्य धन्य जगन्माता । पुरवी मनकामना ॥४॥

सानीमध्यें पावलो तुझे । चिंतिता पावसी बळे ।
आश्चर्य वाटलें मोठें । पुरवी मनकामना ॥५॥

मनांत चिंतिले जाणें । खूण खूणेसि बाणली ।
खरे चि सांगती सर्वे । पुरवी मनकामना ॥६॥

पूर्वीसी राहणे तुझें । पूर्ण सामर्थ्य घेतलें ।
पूर्व पुण्य फळा आले । पुरवी मनकामना ॥७॥

आपुली कीर्ति सांभाळीं । अद्भुत करणी करी ।
आनंदरूप तू माता । पुरवी मनकामना ॥८॥

दास मी रघुनाथाचा । सामर्थ्य तुज बोलिलों ।
न्यून्य पूर्ण क्षमा कीजे । पुरवी मनकामना ॥९॥

## भवानी स्तवन

माय तूं बाप तूं बंधु । गणगोत समस्तहि ।
तुजवीण मला नाही । भवानी भक्तवछले ॥१॥

विदेशी येकला आहे । तुजवीण निराश्रयो ।
दयेंने सर्व सांभाळी । भवानी भक्तवछले ॥२॥

संकटें वारिली नाना । वाढविलें परोपरी ।
नेणतां चुकलो तुला । भवानी भक्तवछले ॥३॥

इछिलें पुर्विले सर्वे । कामना मनकामना ।
संकटी रक्षिले मातें ।भवानी भक्तवछले ॥४॥

वाट मी पाहतों तुझी । दास मी कष्टलो बहु ।
आनंदी नाव राखावे । भवानी भक्तवछले ॥५॥

व्याघ्र चोर भुजंगाचे । भय अत्यंत वाटते ।
संकटी पावते माता । भवानी भयनाशनी ॥१॥

भूतप्रेतसमंधदि । देवतें बहुतांपरी ।
अंतरी चिंतिजे माता । भवानी भयनाशनी ॥२॥

गुप्त उद्वेग चिंतेचा । अंतरी कातरा पडे ।
ते काळी आठवावी ते । भवानी भयनाशनी ॥३॥

संसारी वर्तता धोके । वाटती बहुतांपरी ।
दयाळु आठवा ध्यानीं । भवानी भयनाशनी ।४॥

दयेनें पुर्विले सर्वे । दासाची मनकामना ।
प्रचीती रोकडी आता । भवानी भयनाशनी ॥५॥

## जगदात्मा जगदेश्वरी

जगदात्मा जगदेश्वरी । परमात्मा परमेश्वरी ।
उमा लक्ष्मी गाईत्री । सावित्री ते इंद्रायणी ॥१॥

अहिल्या द्रपदी सीता । तारा मंदोदरी दरी ।
दमंती दुसरी तारा । गंगा भागीरथी उखा ॥२॥

नाना प्रकुर्तीची नामे । पुलोमा रेणुका उखा ।
स्वर्गस्ता किन्नरी कोपी । गंधर्वी गायनी कळा ॥३॥

देव रुसी मुनी योगी । ज्ञानीभक्त बहुविधा ।
नारदु तुंबरादीक । धृव प्रल्हाद आंबऋषी ॥४॥

उपमन्या अन्य नामें । भक्त मुक्त माहां तपी ।
सर्वसंग परित्यागी । आगमी अघोरी हटी ॥५॥

दंडधारी जटाधारी । आधरी भस्मलेपनी ।
विलेपने सुगंधे नाना । अष्टभोग विलासती ॥६॥

सारंग नौरंग नाना । मानामानें स्वरास्वरें ।
ताळप्रबंदाचे गाणें । नाचणें वाद्य सर्वहि ॥७॥

स्तिद्धचि सर्व हि आहे । उमा रमा विलासती ।
पुजीती तुळजा माता । सदा आनंद गोंधळी ॥८॥

त्रौलोक्य पुजानासाठी । वाढती मोडती किती ।
राम वर्दायनी माता । हे माझी कुळस्वामिणी ॥९॥

पाळितो सर्वहि क्षेत्रे । बंधु तो क्षेत्रपाल हा ।
विखार चिर्डिले सर्वे । काळसर्प परोपरी ॥१०॥

## शारदादेवी

कुमारी शारदादेवी । सुंदरा गायनी कळा ।
हंसासनी चतुर्भुजा । वीणा पुस्तक नेटके ॥१॥

ब्रह्मी जाली जगजोती । ब्रह्मसुता म्हणोनियां ।
ब्रह्मसुता वेदमाता । वेद तेथुनि जाहाले ॥२॥

जाणीव म्हणिजे देव्या । जाणता देव बोलिजे ।
सीवशक्ती रत्नजोती । वेगळी करितां नये ॥३॥

सीवशक्ती बहुरुपा । नामरूपी विलासते ।
दिसते नासते काया । माया ते अंतरी वसे ॥४॥

ब्रह्मांडीची मूळ माया । पींडीची जाणिजे परा ।
परा ते मूळ माया ते । वेदमाता म्हणोनिया ॥५॥

मायची माय तीची हि । जन्ननी मात्रु जन्ननी ।
माता माता तीची माता । बोली हे लांबली बहु ॥१॥

माया माया बहु माया । मूळमाया मुळी असे ।
जगाची मुळीची माता । जगन्माता म्हणोनिया ॥२॥

त्रैलोकी समस्तां माता । आंडजारजादिकां ।
सर्वांच्या लांबल्या वोळी । पाहो जातां मुळाकडे ॥३॥

जगन्माता जगत्पिता । सीवशक्तीच जाणिजे ।
शक्ती ते शक्ती जाणावी । सीवशक्ती सदा वसे ॥४॥

शक्ती दोहीकडे आहे । सामर्थ्य याच कारणे ।
त्रैलोकी सर्वहि देहे । शक्तीबीण अशक्त ते ॥५॥

सर्वांची पाळिली कुळे । कुळदेव्या म्हणोनियां ।
दासांची शक्ती दासाला । बोलली कृपाळुपणें ॥६॥

## गोंधळ

अंबे नाम तुझें । चांगले । मन माझें रंगलें ।
मी तरी तुझें वो । बाळक । न करी जनपांगिलें ॥ध्रु.॥

पवित्र ठाणक माहोर । दुसरें तुळजापूर ।
तेथें नांदती । सुंदर । संतांचे माहेर ॥१॥

तिसऱ्याने गाई न मी । आउंद । लागला तुझा छंद ।
मूळपीठ शिखरीं । भवानी । तूं माझी स्वामीनी ॥२॥

चौथ्याने गाइन मी । रेणुका । सप्तश्री चंडिका ।
गोंधळ घालिन मी । भवानी । ध्यान तिहीं लोकीं ॥३॥

तुज मी ध्यातसे । अंतःकरणी । तू माझी स्वामीणी ।
दास करितसे । विनवणी । दोन्ही कर जोडुनी ॥४॥